FYBMM (mar) sem - II ATKT Sub:- E.C

VCD 19/9/16/FYBMM MAR/SEMII/ECII/21/2 HRS/75MKS/180

सूचना- 1)सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक

2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत

प्र1) काश्मीर खो-यात उसळलेल्या हिंसाचाराची बातमी योग्य त्या शीर्षकासह 250 शब्दांमध्ये लिहा. (15)

प्र2) जाहिरातीतील आवश्यक घटक कोणते ते सांगून त्यांचे महत्त्व स्पष्ट करा. (15)

किंवा

प्र2) अ) बातमीचा शिरोभाग म्हणजे काय ते सांगून त्याचे विविध प्रकार उदाहरणांसहित सांगा. (08)

प्र2) ब) तुमच्या शेजारच्या मुलावर हृदय शस्त्रक्रिया करायची आहे. त्यासाठी आर्थिक मदत करण्याबाबत टाटा ट्रस्टला विनंती पत्र लिहा. (07)

प्र3) टीपा लिहा (कोणत्याही 3) (15)

1. ह्यूमन इंटरेस्ट स्टोरी 2. सॉफ्ट स्टोरी 3. हार्ड स्टोरी 4. सहा क कारांचे महत्त्व 5. वर्णनात्मक इंट्रो

प्र4) तुमच्या महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवाची प्रेस नोट हिंदी किंवा इंग्रजीत बनवा. (15)

किंवा

प्र4) अ) पुढील म्हणींचा हिंदी किंवा इंग्रजी अनुवाद लिहा (08)

1. केव्हाच नाही त्यापेक्षा उशीरा बरा
2. चार दिवस सासूचे, चार सूनेचे
3. वरातीमागून घोडे
4. गरज ही शोधाची जननी आहे
5. आरोग्य हेच ऐश्वर्य
6. दिव्याखाली अंधार
7. चकाकते ते सारेच सोने नसते
8. नाचता येईना अंगण वाकडे

प्र4) ब) तुमच्या परिसरात होत असलेल्या कच-याच्या समस्येबाबत वॉर्ड अधिका-यांना हिंदी किंवा इंग्रजीत पत्र लिहा. (07)

प्र5) पुढील परिच्छेदाचे हिंदी किंवा इंग्रजीत भाषांतर करा. (15)

यंदा दहीहंडी उत्सवात सहभागी झालेल्या बालगोविंदांपैकी 4 बालगोविंदा जखमी झाल्यामुळे त्यांना रुग्णालयात दाखल केले आहे. यातील एकाची प्रकृती गंभीर आहे. उल्हासनगरमधील दहीहंडी उत्सवात सहभागी झालेल्या 12 वर्षीय सुजल गडापकर याला जबर मार बसला आहे. हंडी फोडताना पडल्यामुळे सुजलच्या डोक्याला आणि छातीला मार बसला आहे. प्राथमिक उपचार झाल्यानंतर त्याला पुढील उपचारांसाठी मुलुंडच्या फोर्टिस रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काल रात्री उशीरा सीटीस्कॅन आणि अन्य चाचण्या करण्यात आल्या आहेत. त्याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आल्याचे समजते.

किंवा

munotes.in

प्र5) अ) सरहद या स्वयंसेवी संस्थेसाठी स्वयंसेवक हवे आहेत. त्याबाबतची छोटी जाहिरात हिंदी किंवा इंग्रजीत तयार करा. (08)

प्र5) ब) जाहिरातीचे आजच्या काळातील महत्त्व याविषयी रेडिओसाठी हिंदी किंवा इंग्रजीत भाषण तयार करा. (07)

---

munotes.in